आर.सी.एस. नं.२६/२०१८

नि.३५ खाली आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दि. १०/१२/२०२१ रोजीचा म्हणणे नाहीचा हुकुम रद्द होउन म्हणणे दाखल करणे कामी दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जावर वादी यांचे म्हणणे की, वादी यांनी सदरील दावा हा वडिलोपार्जित असलेल्या जमीन वाटपाचा हुकुमनामा व्हावा व वादी यांचे वडील साहेबराव दादा कोंडे यांचेकडुन फसवणुक करुन ०५/०८/२००८ रोजी बनविलेले तथाकथित बक्षीसपत्र बेकायदेशीर असल्याचे व सदरील तथाकथीत बक्षिसपत्र वादीवर बंधनकारक नसल्याचे जाहीर ठराव करुन मिळावा याकरिता सदरचा दावा प्रलंबित आहे. वादी यांचे कायम निवास स्थान हे रा. बेटवाडी ता.दौंड, जि.पुणे असुन त्यांचे वय ७६ वर्ष आहे. वादी यांचे वय पाहता त्यांना संधिवात व इतर व्याधीमुळे प्रत्येक तारखेस प्रवास करणे शक्य होत नाही. तसेच वादी यांना दाव्यातील चालु असलेल्या दाव्याबददलची माहिती वादी यांना मिळालेली नाही. तसेच वादी यांना कायदेशीर बाब मधील ज्ञान नसल्याने जरी काही कागदपत्रे त्यांना मिळाले असले तरी त्यांना दाव्याबबदल माहिती व वेळोवेळी तांत्रीक दृष्टया घेण्यास लागणा-या बाबी वादी यांना माहिती नव्हते. तसेच कोरोना महामारीचा प्रादुर्भाव आल्याने सर्वत्र टाळेबंदी केली होती व महामारी निर्बंध होते तसेच न्यायालय देखील सिमित वेळेसाठी काम करत होती. त्यामुळे वादी यांना सदरील दाव्याबददल कोणतीही माहिती मिळु शकली नाही. तसेच वादी यांना नवीन वकिलांना भेटुन त्यांना दाव्याबददल माहिती दिली व सदरील दाव्यामध्ये वकिलांना हजर होण्यास सांगितले. त्यावेळी वादी यांचे लक्षात आले की, दि.१०/१२/२०२१ रोजी वादी यांचे विरुध्द प्रतिवादी यांच्या प्रती हक्काच्या दाव्याला कैफियत नाही दिली म्हणुन म्हणणे दाखल नाही असा हुकुम करण्यात आला. जर वादी यांना सदर प्रतिहक्काच्या दाव्याला म्हणणे दाखल करण्याची परवानगी दिली नाही तर वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल म्हणुन प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादी यांनी नि.क्रं ३३ येथे म्हणणे दाखल केले आहे ते या अर्जाचे कामी वाचण्यात यावे असे म्हणणे दिले. प्रतिवादीने म्हणणे दिले की, वादी यांनी नमुद केलेला मजकुर खोटा व बनावट स्वरुपाचा आहे. कोरोना महामारी नंतर जानेवारी २०२२ पासुन कोर्ट नियमीत चालु आहे. प्रस्तुत अर्जातील मजकुर चुकीचा असुन केवळ अर्ज मंजुर केलेल्या दिलेल्या सबबी आहेत. त्यामुळे प्रतिवादीने सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

४. वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला. या ठिकाणी अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादीने दाखल केलेल्या प्रतिहक्काचा दावा नि.क्र २२ वर दि.१०/१२/२०२१ रोजी वादीचे म्हणणे नाही असा हुकुम झालेला आहे.

५. प्रस्तुत वादींनी सदरचा अर्ज प्रतिज्ञापत्रासहित दाखल केलेला आहे. तसेच वादी यांनी सदर दि.१०/१२/२०२० रोजीचा म्हणणे नाहीचा हुकुम रदद होण्यासाठी योग्य ते कारण व इतर परिस्थिती याबाबत अर्जात नमुद केले आहे. सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट वादींनी त्यांचे म्हणणे न दाखल केल्यास त्यांचे नुकसान होणार आहे. वरिल सर्व परिस्थिती पाहता व न्यायाच्या हिताच्या दृष्टीने सदर अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. वादींना त्यांचे म्हणणे दाखल करण्याकरिता विलंब झालेला आहे, ज्यामुळे प्रतिवादीची गैरसोय होत आहे. परंतु त्याची भरपाई वादींवरती वाद खर्च लादुन करता येईल. ज्या अर्थी प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरिता असल्याने न्यायाचे तत्व ध्यानात घेउन वादींना त्यांचे म्हणणे दाखल करण्यास संधी देणे उचित होईल. उपरोक्त नमुद कारणमिमांसा व वादी यांना प्रतिहक्काचे दाव्यास म्हणणे दाखल करण्याकरिता विलंब झालेला कालावधी ध्यानात घेउन खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज (नि.३५) खर्चासह मंजूर करण्यात आला.

२. वादी यांचे विरुध्द पारित झालेला प्रतिहक्काचे दाव्यास म्हणणे नाहीचा हुकुम रद्द करण्यात आला.

३. वादी यांनी प्रतिवादी यांना रु.२००/- वाद खर्च दयावा.

(ह.उ.उ.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश, भोर
जि.पुणे.

दिनांक : १६/०८/२०२२